# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

**आस्थापना विभाग**

**एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५**

**फोन नंबर ०७१३२-२१६५९२**


जावक क्रमांक : गों.वि./आस्था/2639/२०१६ दिनांक :-28.१०.२०१६

## परिपत्रक

विषय : तंबाखु व दारु दुष्परिणामाबाबत जनजागृती व दंडात्मक कार्यवाहीबाबत.

संदर्भ : १) मा. जिल्हा आरोग्य अधिकारी तथा सचिव, दारु व तंबाखु मुक्ती अंमलबजावणी समिती गडचिरोली यांचे पत्र क्र. जिआअ,गड/आस्था/२३२४/२०१६, दि. ११/०७/२०१६

२) मा. अध्यक्ष, दारु-तंबाखु मुक्त, जिल्हा विकास कार्यक्रम तथा जिल्हाधिकारी गडचिरोली यांचे पत्र क्र. जिपग/आरोग्य/तदामुजिविका/आरोग्य/२८२९/२०१६, दि. ३१/०८/२०१६

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, केंद्र शासनाच्या सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने कायदा २००३ (COTPA), मधील नियम ४ व ६ नुसार सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करण्यास तसेच तंबाखुजन्य उत्पादने विक्रेत्यांनी १८ वर्षाखालील मुलांना सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने विकण्यास आणि शिक्षण संस्थाच्या १०० यार्ड परिसरात सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने विकण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. सदर कायद्याच्या नियमांचे उल्लघन करणाऱ्यांकडून रुपये २००/- इतका दंड वसुल करण्याची तरतुद आहे. कलम ६(अ,ब) अन्वये दंड वसुल करण्यासाठी कुलसचिव/संचालक/मुख्याध्यापक/प्राचार्य किंवा शैक्षणिक संस्थेचा प्रमुख हे सक्षम अधिकारी यांची राहील.

त्याअनुषंगाने विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयाना सुचित करण्यात येते की, केंद्र शासनाच्या सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने कायदा २००३ (COTPA), ची अंमलबजावणी करण्यासाठी शैक्षणिक संस्था व परिसर दारु - तंबाखु मुक्त करण्यासाठी आपल्या स्तरावर आवश्यक उपाययोजन करण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास सादर करावा.

(डॉ. एस. एम. रोकडे)
कुलसचिव(का)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

१) मा. कुलगुरुंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

E:\Right of information act under matter 2016\government leter RTI/03